# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**

**दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व),मुंबई - ४०० ०६५**

---

**७६ वा कान्स आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव फिल्म बाजार - २०२३ करीता आवश्यक असणारे पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत.**

१. कान्स आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - २०२३ फिल्म बाजारमध्ये भाग घेण्यासाठी दि.०१ जानेवारी, २०२२ ते दि.३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीत सेन्सॉर प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या मराठी चित्रपटांचा समावेश असेल.

२. सदर जाहीरातीचा कालावधी दिनांक ०९/०२/२०२३ ते दिनांक २४/०२/२०२३ असा राहील.

३. विहित नमुन्यातील अर्ज भरून ते प्रत्यक्षात अथवा cfffm2023@gmail.com ई-मेलद्वारे दि.२४/०२/२०२३ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

४. निवड झालेल्या ३ चित्रपटांची यादी जाहीर झाल्यानंतर निर्माता / निर्मिती संस्थांना त्यांच्या चित्रपटाची DCP व KDM स्व:खर्चाने महामंडळास उपलब्ध करून द्यावी लागेल.

५. कान्स आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - २०२३ फिल्म बाजार करीता निवड झालेल्या ३ चित्रपटांचे निर्माते / दिग्दर्शक / प्रतिनिधी यापैकी एकाच व्यक्तीचा समावेश असेल. त्याचप्रमाणे त्यांचा संपूर्ण खर्च (यामध्ये कान्स येथे जाणे - येणे प्रवास खर्च, वास्तव्याचा खर्च, दैनंदिन खर्च) महामंडळामार्फत करण्यात येईल.

६. निवड झालेल्या चित्रपटांचे स्क्रिनिंग सुध्दा महामंडळामार्फत करण्यात येईल.

७. कोणत्याही वेळी प्रक्रिया रद्द करण्याचे अथवा बदल करण्याचे सर्वाधिकार महामंडळ राखुन ठेवत आहे.